भुसंपादन अर्ज क्रमांक **१२०/२०२३**
भागीरथीबाई वि. शासन
निशाणी क्रमांक **५० खाली**

**CNR No. MHOS140002422023**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा शपथेवर जबाब**

**नाव – नंदकुमार श्रीनिवास पोकलवार**
**वय – ५९ वर्षे**
**व्यवसाय – व्हॅल्यूयर**
**राहणार – लातूर**

**सरतपाविधीज्ञ श्री. बी. बी. सूर्यवंशी यांच्यामार्फत सुरु**

या प्रकरणात अर्जदाराच्या मागण्यानुसार मी मौजे मुगाव ता. परांडा येथील गट क्र. १ येथील विहिरीचे मूल्यांकन दि. १०.०५.२०११ रोजी मी स्वतः केले होते. या प्रकरणात मी दिलेला मूल्यांकन अहवाल दाखल असून त्यावर माझी सही व शिक्का आहे. मूल्यांकन अहवालातील मजकूर बरोबर आहे. मूल्यांकन अहवालात विहिरीचे मूल्यांकन रु ४,७९,२०५/– दाखवण्यात आले. मूल्यांकन अहवालास निशाणी क्र. ५१ देण्यात येत आहेत. मी विहिरीचा पंचनामा तयार केला असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. पंचनाम्यास निशाणी क्र. ५२ देण्यात येत आहे.

**गैरअर्जदार क्र. ३ तर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ श्री. एस. डी. गटकुळ यांच्याकडून**

२. विहिरीचे मूल्यांकन करण्यापूर्वी मी गैरअर्जदारांना नोटीस पाठवून हजर राहणेबाबत कळविले नवहते. तसेच गावातील तलाठी किंवा ग्रामसेवक यांनादेखील कळविले नव्हते. मी साधारणतः २५ वर्षापासून मूल्यांकनाचे काम करत आहे. प्रस्तुत प्रकरणात पारीत झालेल्या अर्वाडाची मला माहिती नाही. मी जागेवरुन विहिरीचे मोजमाप करुन मूल्यांकन केले होते. विहिर संपादीत झाल्याची माहिती मला अर्जदाराने तोंडी सांगितली होती. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराने मला अर्वार्ड व त्याबाबतचे कागदपत्र दिलेले नव्हते. भू संपादन अधिकारी यांनी अर्जदारास विहिरीचा मोबदला दिला आहे किंवा नाही, याबाबत मला सांगता येणार नाही. दरवर्षीच्या डीएसआर संपादीत झालेल्या जमिनी, त्यातील विहिर इत्यादीचे मूल्यांकन केले जाते, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे

भुसंपादन अर्ज क्रमांक **१२०/२०२३**
भागीरथीबाई वि. शासन
निशाणी क्रमांक **५० खाली**
**CNR No. MHOS**140002422023

की, डीएसआर हे प्रत्येक विभागासाठी एकच असतो. शासनाने ठरवून दिलेल्या डीएसआर प्रमाणे मूल्यांकन केले जाते, याबाबत मला माहिती नाही. मी अर्जदाराच्या जमिनीत गेला होतो, याबाबतचे फोटो काढलेले नाहीत.

३. विहिर साधारणतः १६ मीटर खोल आहे. विहिरीचा व्यास ११.५० मीटर आहे. विहिरीत असलेले पाणी माझ्या सांगण्याप्रमाणे अर्जदाराने बाहेर काढले होते. मी विहीरीचा पंचनामा करतेवेळेस साधारणतः ५ ते ६ फुट पाणी राहिलेले होते. पंचनामा निशाणी ५२ मध्ये विहिरीत ५ ते ६ फुट पाणी होते, असा मजकूर लिहिला नाही. मी विहिरीचे वर्णन सविस्तर मूल्यांकनमध्ये दिले आहे. अर्जदाराचे लोक विहिरीत उतरुन माझ्या सांगण्याप्रमाणे मोजमाप घेतलेले होते. विहिरीत उतरण्यासाठी पाय–या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराच्या गटात चालू विहिर अस्तीत्वात नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराच्या सांगण्याप्रमाणे मी विहिरीचे खोटे व बनावट मूल्यांकन अहवाल दिलेला आहे. मी अर्जदाराकडून साधारणतः २०००/– ते ३०००/– फी घेतली होती. मी अर्जदारास फी मिळाल्याबाबत पावती दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा पंचनामा व मूल्यांकन अहवाल तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**गैरअर्जदार क्र. १, २, ५ ते ७ यांचा पुकारा केला असता ते गैरहजर त्यांच्या वतीने साक्षीदाराचा उलटतपास नाही.**

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.08.12 17:24:10 +0530

**अ. अ. शेख**

दिनांकः–१२.०८.२०२६

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | G. I. Khobre<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 12-08-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 12-08-2026 |
| Order uploaded on | - | 12-08-2026 |